# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ६ वा ❑ भारतीय सौर दिनांक १५ माघ शके १९४७, बुधवार दि.०४ फेब्रुवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## वर्षपूर्ती संपादकीय

## खोडकर विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष नको!

– संजय व्यापारी

**ज्योतिर्मय साहित्य**

शाळकरी मुलांचे खोडकर होणे हे त्यांच्या वाढीच्या वयातील नैसर्गिक वर्तन असू शकते, जे अनेकदा त्यांच्या निरागस स्वभावाचे द्योतक आहे.हे वर्तन कधीकधी शाळेत जाण्यास नकार देणे किंवा अती उमेदीचे संकेत असू शकते

पालकांनी मुलांशी संवाद साधून, त्यांना योग्य दिशा दाखवून आणि समजून घेऊन या वर्तनात सुधारणा करणे गरजेचे आहे. अन्यथा खोडकर मुल आक्रमक व चुकीच्या मार्गाने जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उत्तर प्रदेश मध्ये एक थरकाप उडवणारी घटना घडली शाळेत खेळता खेळता विद्यार्थ्यांच्या दोन गटात वाद झाला व मित्रांनी पाचवीच्या विद्यार्थ्यांचे डोळे फोडले. शाळेच्या मैदानात फिरताना झालेल्या वादातून

पाचवीच्या एका विद्यार्थ्याला त्याच्याच इयत्ता पाचवी व तिसरीतील मित्रांनी अमानुष मारहाण केली मारहाणीत चेहरा आणि डोळे बुटाच्या टाचेने रगडल्यामुळे या चिमुरड्याची दृष्टी गेली आहे. बुटाच्या टाचेने पीडित मुलाचे डोळे आणि चेहरा जोरात रगडला या हल्ल्यात विद्यार्थ्यांच्या डोळ्यांच्या बाहुल्यांना गंभीर इजा झाली असून त्याला दिसायचे पूर्णपणे बंद झाले आहे.

शाळेत, वर्गात किंवा शाळेच्या मैदानात असे प्रकार घडू नये. यासाठी शिक्षकांनी व शालेय व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांकडे लक्ष द्यायला पाहिजे.थोडासा हलगर्जीपणा नको तो परिणाम समोर येत असतो. शिक्षकांनी व पालकांनी खोडकर,उनाड असणाऱ्या मुलांशी रागावणे व त्याचा द्वेष करणे त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नये.

लहान मुले वयोमानानुसार खोडकर वागतात, कारण त्यांना योग्य-अयोग्य समज नसते.वर्गातील परिस्थिती शिक्षकांनी समजून घेतली शिक्षक आणि इतर विद्यार्थ्यांसाठी ही वर्तणूक आव्हानात्मक असू शकते, पण हे सहसा मुलांच्या संवेदी गरजा पूर्ण न झाल्यामुळे घडते.

काही वेळा मुले प्रचंड खोडकर बनतात, जसे की घर सोडून पळून जाणे किंवा चोरटी प्रवृत्ती, ज्यासाठी योग्य समुपदेशनाची गरज असते.

पालक आणि शिक्षकांनी मुलांच्या वर्तणुकीमागील कारण समजून घेतले पाहिजे.संवेदी गरजा लक्षात घेऊन वर्गातील वातावरण बदलायला पाहिजे. अति खोडकरपणावर मुलांसोबत उपाय म्हणून प्रेमाने आणि समुपदेशनाने मुलांमध्ये सुधारणा घडवून आणायला पाहिजे.

खोडकर विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष न करता त्यांच्या वर्तनाकडे लक्ष देणे, त्यांना समज देणे आणि त्यांच्या ऊर्जेला योग्य दिशा देणे गरजेचे आहे. अशा विद्यार्थ्यांच्या खोड्यांकडे दुर्लक्ष केल्यास त्यांचे वर्तन अधिक बिघडू शकते. शिक्षकांनी संयमाने व रचनात्मक मार्गाने समस्या सोडवाव्यात, ज्यामुळे त्यांच्या वागण्यात सुधारणा होईल. खोडकर विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष केल्यास खोडकर विद्यार्थी अधिक धाडसी बनू शकतात, ज्यामुळे वर्गप्रक्रिया विस्कळीत होऊ शकते. बऱ्याचदा खोडकर वर्तन हे शिक्षकांचे किंवा मित्रांचे लक्ष वेधून घेण्यासाठी असते. अशा वेळी दुर्लक्ष करणे त्यांना अधिक खोड्या करण्यास प्रवृत्त करू शकते.वेळेवर योग्य समज न दिल्यास, खोडकरपणा त्यांच्या सवयीचा भाग बनू शकतो. अशा विद्यार्थ्यांना रिकामे न ठेवता, उपक्रम किंवा जबाबदाऱ्यांमध्ये गुंतवून ठेवा, संवाद ज्यामुळे त्यांना खोड्या करायला वेळ मिळणार नाही.

खोडकर वर्तन नियंत्रित केले नाही किंवा त्यावर लक्ष ठेवले नाही तर मुले स्वतःला अडचणीत आणू शकतात. याचे दीर्घकाळात मुलांच्या विकासावर गंभीर परिणाम होऊ शकतात. शिस्त न पाळणाऱ्या मुलाच्या वागण्याचा त्याच्या सामाजिक जीवनावरच परिणाम होत नाही तर त्याचा शैक्षणिक वाढीवरही मोठा परिणाम होतो. शिस्त नसलेल्या मुलाला अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे कठीण जाईल आणि तो बहुतेक ज्ञान मिळवू शकणार नाही. मुलांना शिस्तीचे महत्त्व पटवून देणे ही गुरुकिल्ली आहे .हे शिक्षक व पालकांनी समजून घेतले पाहिजे. खोडकर मुले पालकांसाठी त्रासदायक ठरू शकतात. परंतु त्यांना शिक्षा करण्याऐवजी त्यांच्या वागण्यामागील योग्य कारण शोधणे महत्वाचे आहे. बऱ्याचदा, आपल्याला हे कळत नाही की मूल आपल्या पावलावर पाऊल ठेवून चालत असेल. आणि अशा सर्व प्रकरणांमध्ये, समस्या ओळखणे आणि योग्य उपाय शोधणे महत्वाचे आहे. पालक म्हणून, शिक्षक आपण आपल्या मुलांसाठी आदर्श आहोत या वस्तुस्थितीकडे आपण अनेकदा दुर्लक्ष करतो. आणि आपण जाणूनबुजून किंवा अजाणतेपणे जे काही करतो त्यात ते आपले अनुसरण करतात. कठोर भाषेचा वापर, भांडणे आणि पालकांचे इतर सर्व नकारात्मक गुण मुले सहजपणे स्वीकारतात. म्हणून मुलाच्या वर्तनावर लक्ष ठेवण्याचा विचार करण्यापूर्वी, किमान मुलाच्या उपस्थितीत तुमच्या वर्तनात सर्वोत्तम आहात याची खात्री करा. आपल्या वैयक्तिक बाबी आणि कुटुंबातील वाद हे देखील मुलाच्या हट्टी स्वभावाचे कारण असू शकतात. कारण या सर्व नकारात्मक गुणांचा मुलाच्या प्रभावी मनावर परिणाम होतो. आणि तो/ती तुमच्याकडून हे नकारात्मक वर्तन शिकेलच.म्हणून पालक व शिक्षकांनी संयम राखत मुलांना समजून घेतले पाहिजे.खोडकर मुलांमध्ये भरपूर ऊर्जा असते जी इच्छित परिणाम मिळविण्यासाठी वापरली जाऊ शकते. तथापि, खोडकर मुलाला त्याच्या वर्तनात सुधारणा करण्यासाठी शिस्त लावण्याची कला शिकण्याची आवश्यकता आहे. मुलांसोबत अधिक वेळ घालवा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रकार समजून घ्या आणि त्यांच्यासाठी योग्य योजना तयार करा.

# २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवी लोकनाथ यशवंत

**ज्योतिर्मय साहित्य**

छ. संभाजीनगर : विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने नांदेड येथे आयोजित २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवी, लेखक, अनुवादक लोकनाथ यशवंत (नागपूर) यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती आज आयोजित पत्रकार परिषदेत विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी व स्वागताध्यक्ष राहुल एस एम प्रधान (नांदेड) यांनी दिली. हे संमेलन दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेज मैदानावर संपन्न होणार आहे. कवी लोकनाथ यशवंत हे १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलन (छ.संभाजी नगर) अध्यक्ष डॉ.अशोक राणा (यवतमाळ) यांच्याकडून सूत्रे हाती घेतील.

विद्रोही सांस्कृतिक चळवळ जीवनाच्या सर्व क्षेत्रात समतेचा पुरस्कार करते. ''तुमच्या ग्रंथांमध्ये अखिल मानवाचे हित होईल याचे बीज नाही''असे म्हणत म.जोतिराव फुले यांनी उंटावरून शेळ्या वळणाऱ्या घालमोड्या दादांच्या संमेलनास विरोध केला होता. तीच मराठी साहित्य संमेलने आता विषमतावादी सांस्कृतिक राजकारणाचे मुखंड बनली आहेत. म्हणूनच विद्रोही चळवळीच्या वतीने १९९९ पासून महाराष्ट्रात मुंबई (धारावी), कोल्हापूर, छ.संभाजीनगर अमरावती, सोलापूर, नंदुरबार,वाशी, पुणे, मनमाड,धुळे,नाशिक,परभणी, बुलढाणा, हिंगोली, उदगीर,नाशिक, वर्धा,अमळनेर, छ. संभाजीनगर इ. ठिकाणी १९ साहित्य संमेलने तसेच १ आंतरराज्य (निपाणी) व १ विद्रोही स्त्री साहित्य संमेलन, पुणे यशस्वीपणे आयोजित करण्यात आले आहेत. कालकथित बाबुराव बागुल, वाहरु सोनवणे,डॉ. यशवंत मनोहर, डॉ. अजिज नदाफ, आत्माराम कनीराम राठोड, कॉ. तारा रेड्डी, तुळसी परब, डॉ.आ.ह. साळुंखे, संजय पवार, जयंत पवार, उर्मिला पवार, डॉ.श्रीराम गुंदेकर, डॉ. प्रतिभा अहिरे, विमल मोरे, डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. आनंद पाटील, गणेश विसपुते, चंद्रकांत वानखेडे, डॉ. वासुदेव मुलाटे, डॉ. अशोक राणा यांसारख्या सर्जनशील साहित्यिक, समीक्षक, अनुवादक, पत्रकार, इतिहासकार, नाटककार यांनी विद्रोही साहित्य संमेलनाची अध्यक्षपदे भूषवली आहेत.पत्रकार परिषदेत बोलताना विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्षा प्रा.




प्रतिमा परदेशी यांनी सांगितले की, दलित, पीडित आणि शोषितांच्या वेदनांना मराठी कवितेच्या केंद्रस्थानी आणणाऱ्या कवींच्या परंपरेत लोकनाथ यशवंत अग्रभागी आहेत. सलग पाच दशके ते कविता लिहिताहेत. त्यांच्या कवितेमुळे मराठी कवितेचा सामाजिक व वैचारिक चेहरा अमुलाग्र बदलला.

लोकनाथ यशवंत यांच्या कवितेला विवेकनिष्ठ परिवर्तनाची वैश्विक आस आहे. त्यांची कविता परंपरेला विधायक नकार देत क्रांतिकारी सामाजिक व सांस्कृतिक जाणीवेच्या आधारावर मानवतेचा सत्याग्रही ध्येयवाद व्यक्त करते, असेही प्रा. परदेशी यांनी यावेळी नमूद केले. त्यांच्या कवितेतील उपरोध व आत्मटीका ही शैली सत्तेच्या दमनकारी यंत्रणेविरोधात प्रखर भूमिका मांडणारी आहे.

विसाव्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी निवड करण्यात आलेले कवी लोकनाथ यशवंत हे समकालीन मराठी कवितेतील महत्त्वाचे नाव असून आता होऊन जाऊ द्या !, आणि शेवटी काय झाले?, पुन्हा चाल करू या, बाकी सर्व ठीक आहे, हे तर होणार होते हे त्यांचे ५ कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कवितांचे हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये ४ अनुवाद ऐलान, आखिर क्या हुआ, ब्रोकन मॅन, द डाउन्ट्रोडन या नावाने प्रकाशित झाले आहेत.

त्यांच्या कवितांवर ४ नाट्यरूपांतरे – एकपात्री प्रयोग, एकांकिका, नाट्यप्रयोग झाले आहेत.त्यांच्या शेतकरी आत्महत्येच्या पार्श्वभूमी वरील ''बैल'' या कवितेवर बाईस्कोप हा मराठी चित्रपट साकारण्यात आला आहे. लोकनाथ यशवंत यांनी स्वतः ४ अनुवाद मन्सूर एजाज जोश, निदा फाजली यांच्या कविता आणि सहादत हसन मंटो यांच्या लघुकथांचे हिंदीतून मराठीत अनुवाद केले आहेत. तर बाबुराव बागुल यांच्या कवितांचा हिंदी अनुवाद देखील त्यांनी केला आहे. त्यांच्या निवडक कवितांचे दोन संग्रह ''आता आणि पुन्हा...'' (संपा. इसादास भडके) '' यशवंत कविता लोकनाथची'' ( सं.मेघमाला मेश्राम) प्रसिद्ध झाले आहेत

त्यांच्या कविता विविध राज्यातील शिक्षणक्रमात समाविष्ट असून त्यावर विद्यापीठांमध्ये शोधप्रबंधही प्रसिद्ध झाले आहेत. आजच्या विद्वेषी व अघोषित आणीबाणीच्या कालखंडात संविधानिक लोकशाहीवर क्रूर हल्ला होत असताना सत्य व मानवतेसाठी क्रांतीकारी कविता घेऊन मैदानात उभ्या ठाकलेल्या कवी लोकनाथ यशवंत यांच्या निवडीमुळे विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने आयोजित हे विसावे साहित्य संमेलन फ ुले शाहू आंबेडकर प्रणित समतावादी विचारांना बळ देणारे ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या पत्रकार परिषदेस नांदेड विसाव्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष राहुल एस एम प्रधान हे आहेत. या पत्रकार परिषदेला विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी, प्रा.भारत शिरसाठ, एड.वैशाली डोळस,अनंत भवरे हे विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे राज्य पदाधिकारी उपस्थित होते.

# ‘वाचनं ज्ञानदं बाल्ये तारुण्ये शीलरक्षकम् ।

**ज्योतिर्मय साहित्य**

वाचनाने, भाषणे ऐकल्याने माणूस घडतो. समाजात होऊन गेलेल्या अनेक मोठ्या माणसांनी वाचन केल्यामुळेच ते ज्ञानी झाले.संस्कृत भाषेत एक सुभाषित आहे

‘वाचनं ज्ञानदं बाल्ये तारुण्ये शीलरक्षकम् ।
वार्धक्ये दुःखहरणं हितं सदग्रन्यवाचनम ।।

याचा अर्थ असा आहे की, चांगले वाचन बालपणी ज्ञान देते, तारुण्यात चारित्र्याचे रक्षण करते आणि वृध्दपणी दुःखे दूर करते. म्हणजेच वाचन सगळ्यांसाठी हितकारक आहे. लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्थेच्या मराठी माध्यमाच्या शाळा ३५ वर्षापूर्वी मी सुरू केल्या. ज्या शाळांमध्ये फी-डोनेशन काहीही नाही. या दोन प्राथमिक आणि तीन माध्यमिक मराठी शाळांमध्ये वाचन प्रकल्प, मी वाचलेले पुस्तक, कथाकथन अशा वेगवेगळ्या संकल्पनाव्दारे विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावण्यात आम्ही सर्व यशस्वी झालो आहोत. विशेषतः शिक्षक विद्यार्थ्यांकडून हस्तलिखिते तयार करून घेणे ज्यामध्ये, त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांना वाव देऊन ते सर्व या हस्तलिखितात घेतले जाते.



स्नेहसंमेलनाऐवजी बालकुमार मराठी साहित्य संमेलन प्रत्येक शाळेमध्ये घेऊन विद्यार्थ्यांना त्यांच्यामध्ये असलेल्या कथाकथन, मी वाचलेले पुस्तक, नाट्यप्रवेश, गाणे, समूह गीत, डान्स या विषयांना प्राधान्य दिले जाते. या मराठी साहित्य संमेलनाला माजी विद्यार्थ्यांना आमंत्रण देऊन त्यांनी केलेली प्रगती त्यांनीच विद्यार्थ्यांना सांगितल्यावर, आपणही असे घडू शकतो याचा विश्वास विद्यार्थ्यांना मिळतो. लोकमंगल हायस्कूल नागेवारी-कुशी या ठिकाणी मी २००६ साली डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी घेऊन गेलो होतो. त्यावेळी आठवीत शिकत असणारा विद्यार्थी प्रशांत जनार्दन सावंत सध्या अमेरीकेत मोठ्या हुद्यावर कार्यरत आहे. प्रशांतने या शाळेला गेल्या आठवड्यात इमारत विकसित करण्यासाठी पन्नास हजार रुपये शाळेच्या अकांउटवर जमा केले. एव्हढेच नव्हे तर शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी त्याचा जिद्दीचा शिक्षणाचा प्रवास लिहून पाठविला. तसेच मी जेव्हा भारतात येईन तेंव्हा शाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी येइन असेही नमूद केले.



*शिरीष चिटणीस*
*सातारा मो. 75888 65051*

प्रशांत म्हणतो...

मी प्रशांत जनार्दन सावंत. मी सध्या अमेरिकेत सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून कार्यरत आहे. कुशी या एका छोट्याशा गावातून सुरू झालेला माझा हा प्रवास अत्यंत समृद्ध आणि आनंददायी राहिला आहे. या प्रवासात मला अनेक मित्र, शिक्षक आणि अनोळखी लोक भेटले, ज्यांचा मी मनापासून ऋणी आहे. अशा स्वावलंबी आणि अष्टपैलू संस्कृतीत वाढलो, हे मी माझे भाग्य समजतो. **(क्रमशः)**










# जात्यावरच्या ओव्या......

धांडे आण शेकायला
याला म्हण 'सासु'
नही आणलीस सासु
नको शेकोटीपाशी बसू ॥४८०॥

शेकोटी भवती
गोठी ,कोडी चाले
बाबा विचारे नाता
कोण शेपटीन पाणी पिले? ॥४८१॥

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# ये दिल मांगे ( नो ) मोअर...




ज्योतिर्मय साहित्य

आजकाल बाहेर जेवणाची मोठी लाट आली आहे. मोठमोठ्या शहरात तर सुटीच्या दिवशी जेवणासाठी रांगा असतात. लोक मोठ्या गर्दीतून प्रवास करून तिथे पोहोचतात. तिथे पोहोचल्यावर पाहावे तर गाड्यांचे पार्किंग फुल्ल. गाडी कुठेतरी दूर पार्क करून नंबर लावून जेवायला मिळेतोपर्यंत कोण दमछाक होते ! वेटरने एकदा आपले नाव पुकारले आणि कोपऱ्यातील टेबलाकडे अंगुलीनिर्देश केला की आम्ही धन्य ! मग सुरुवात पाण्यापासून होते. आम्ही ऐटीत बाटलीबंद पाणी मागवतो कारण हॉटेलात पुरवल्या पाण्यावर ते चांगले असेलच यावर आमचा विश्वास नसतो. जेवणाचे हजारो रुपये बिल आकारणाऱ्या हॉटेल्सची शुद्ध पिण्याचे पाणी देण्याची जबाबदारी नाही का ? प्रत्येक हॉटेलवाल्याने आपल्या ग्राहकांसाठी पाणी शुद्धीकरणाचे संयंत्र बसवून त्यांना पिण्याचे पाणी मोफत द्यायलाच हवे असे मला वाटते. ग्राहक चळवळीतूनच ही गोष्ट साध्य होऊ शकेल.





पण आज मला तुमच्याशी बोलायचं आहे ते प्रामुख्याने शीतपेयांच्या वाढत्या वापराबद्दल. या लेखाच्या सुरुवातीला मी जी दृश्ये दाखवली आहेत, त्यातून शीतपेयांचा वाढता वापर आणि त्याला मिळत असलेली समाजमान्यता लक्षात येते. आज जी शीतपेये जाहिरात करून अतिशय चांगली, प्रतिष्ठेची असल्याचे भासवले जाते, ती प्रत्यक्षात आपल्या आरोग्यवर फार भयंकर परिणाम करणारी आहेत. थम्स अप, कोका कोला, फंटा, पेप्सी, स्प्राईट, माजा ही आणि इतर अनेक.

ही सगळी शीतपेये एकमेकांची जुळी भावंडे आहेत. या सगळ्या शीतपेयांच्या दुष्परिणामाविरुद्ध सगळ्यात आधी आवाज उठवला तो स्वदेशीचा प्रचार आणि प्रसार करणारे स्वर्गीय राजीव दीक्षित यांनी.

बऱ्याचशा शीतपेयांमध्ये फॉस्फरिक ॲसिड वापरले जाते. या ॲसिडचा वापर संडास साफ करणाऱ्या हार्पिक सारख्या टॉयलेट क्लिनर मध्ये केला जातो. थोडा वेळ आपण ते टॉयलेटमध्ये टाकून नंतर फ्लश करतो. संडास एकदम चकाचक. फॉस्फरिक ॲसिडमुळे शरीरातील पोटॅशियम, मॅग्रेशियम इ चे प्रमाण बिघडते. आपल्या शरीरातून कॅल्शियम काढून घेऊन ही शीतपेये आपली हाडे ठिसूळ करतात. दातांची हानी करतात. अशी ही शीतपेये वारंवार घेतल्याने पोटातील नाजूक आतड्यांचे काय होत असेल याची नुसती कल्पना करणे सुद्धा अंगावर काटा आणते. या पेयांना आपण सॉफ्टड्रींक्स असा छान शब्द वापरतो. ही शीतपेये कोणत्याच अर्थाने सॉफ्ट वाटत नाहीत.

(क्रमशः)



दासबोध स्तवन




उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# बध्दमुक्तनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

शुक व वामदेव या दोघांच्या शिवाय अनेकांचा उध्दार यामुळेच घडला. शुकाने अनेक विषयावर विवेचन केले आहे तो मुक्त होता हे वेदवचन खरे मानले पाहिजे. तो लाकडा सारखा निर्जीव ब्रम्ह रूप नव्हता. श्रीमत भागवतात सांगितले आहे की योगेश्वर शुक जर काष्ठवत निर्जीव, ब्रम्ह रूप असता तर त्याला आत्मानात्मविवेक बोलून सांगता आला नसता. जो ब्रम्ह रूप होतो तो लाकडासारखा कर्मरहित होछन पडतो, हा अगदीच चुकीचा समज ठरेल.

शुक ब्रम्हस्वरूप असू न त्याने परीक्षित राजाला एवढे भागवत सांगितले.



# आसक्ति भगवंताची असावी

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

कोणत्याही धर्माची आपण कधीही निंदा करू नये. प्रत्येक धर्मात निरनिराळे विधी लावलेले असतात. धर्माला विधींची फार जरुरी असते. विषयसुद्धा आम्ही विधीने भोगतो. आम्ही गंगेवर स्नानाला जातो असे म्हणतो. खरोखर, मनाने आपण गंगेवर गेलो तरी चालू शकते. तेव्हा गंगेला स्नानाला जाऊन अपवित्र मनाने परत आलो तर त्या स्नानाचा काय उपयोग ? नाम घेऊन विषयाचा धंदा केला तर काय उपयोग ? कर्माची बंधने तुटावीत म्हणून शास्त्राची बंधने पाळावी लागतात. देवाला पैसा देण्याचा हेतू हाच की, माझा लोभ कमी व्हावा. खरे म्हणजे, आपल्याला कर्म केल्याशिवाय करमतच नाही. पण आपण फळाची आशा उगीचच करीत बसतो; इथेच आपले चुकते. काहीही न करता राहणे मनुष्याला शक्य नसते. उदाहरणार्थ, एखाद्याला सांगितले की, हातपाय न हलविता, काही न करता, स्वस्थ रहा, तर ती त्याला शिक्षाच होईल. जर काही तरी करणे जरूरच आहे, तर उचितच गोष्ट करावी. जी गोष्ट बंधनाला कारण होते ती विपरीतच असते. कर्तेपणाच्या अभिमानाने केलेले कर्म हे असे विपरीत कर्म होय. ज्ञानावस्थेमध्ये झालेले कर्म पूर्णच असते. त्या अगोदरचे कर्म पूर्ण होत नाही. धर्म तरी काय सांगतो ? तर प्रत्येकाने आपले कर्तव्य करावे. पण कर्तव्य तरी कशासाठी करायचे ? तर ते भगवंतासाठी होय. भगवंताच्या ठिकाणी श्रद्धा ठेवून कर्तव्य करावे, तरच मानव सुखी होईल.

सुधारणांनी सोयी केल्या, म्हणजे देहसुख वाढविले. त्याने परावलंबित्व मात्र आले; आणि परावलंबनात खरे सुख नाही. लौकिक विद्या ही खरी विद्या नव्हे, अविद्याच ती. विद्येने एक समाधान तरी मिळाले पाहिजे, किंवा हमखास पैसा तरी मिळाला पाहिजे. या दोन्ही गोष्टी तिने साधत नाहीत. विद्वानालासुद्धा ' मला नोकरी द्या ' म्हणून अर्ज करावा लागतो; म्हणजे ती विद्या स्वयंप्रकाशी नाही. जीवनाला हवा, पाणी, अन्न या वस्तू आवश्यकच आहेत, त्या कशाही मिळवाव्यात. पण बाकीच्या वस्तू काही आवडीखातर, तर काही लौकिकात जरूर म्हणून पाहिजेत. पैसा असेल तर दैन्यवाणे राहू नये, पण त्यामध्ये आसक्ती असू नये. आसक्ती भगवंताच्या ठिकाणी असावी, आणि इतर प्रापंचिक वस्तूंबद्दल उदास असावे. ' मला कुणी शत्रू नाही आणि मित्र नाही ' अशी ज्याची खरी वृत्ती तो सुखी. जो कशावरही अवलंबून नाही, ज्याच्या आड काही येत नाही, तो मुक्त समजावा. देहाला कुठेही लागले तरी आपल्याला जाणीव होते; त्याप्रमाणे मनाच्या सर्व वृत्तींमध्ये भगवंताचे स्मरण असणे हेच अनुसंधान होय; हीच विद्या होय, हाच खरा धर्म होय, आणि हेच परमार्थाचे सार होय.

ज्याच्या प्रपंचामध्ये पाठीराखा परमात्मा आहे, तो प्रपंचच त्याचा परमार्थ होतो.



# श्री संत ज्ञानेश्वर अभंग व अर्थ

♦अभंग 29 अर्थ♦

पुढे......

मातृवध वाईट खरा, तरीही परशुरामाची कीर्ति पुराणाच्या रूपाने वर्णन केली. बाप ! बाप ! धन्य ! धन्य ! त्या श्रीकृष्णाची. त्याने जितके दैत्य मारले, त्या सर्वांची पातके नाहींशी करून टाकली. प्रजेच्या व्यवहारात सत्यपणाच्या निर्धाराकरिता राजाची शपथ घालतात, पण राजाच्या वागणुकीला नियम कसला घालावा ? त्याप्रमाणे जीवाला जगदीश्वर श्रीकृष्णाचे भय आहे खरे; परंतु श्रीकृष्णाला कोणाचे भय असणार ? अशी त्याच्या वागणुकीची प्रौढी आहे. ॥३॥ याप्रमाणे चराचरातील दैत्य शोधून, निरनिराळ्या प्रकाराने मारले. त्यामुळे सर्व यादवांना संपन्नतेची मोठी घमेंड झाली. म्हणून त्यांनाही प्रभासक्षेत्री नेऊन त्यांचाही नाश केला. ही आपली आई देवकी किंवा ही विष पाजण्याला आलेली पुतना, अशा द्वैतभाव त्याच्या मनात राहिला नाही. वैर आणि भक्ती ही एकाच किंमतीने त्याच्या ठिकाणी राहतात. वारा हा कधी चांगला किंवा वाईट मार्ग शोधून चालत असतो काय ? त्याला बरे वाईट कोणतेही मार्ग सारखेच. समर्थ भगवान श्रीकृष्ण, जे करील ते सर्व उत्तमच. ॥४॥ या भगवान गोविंदाची माय म्हणजे माया, काय आहे हे ब्रह्मादिकाला कळणेसुध्दा कठिण आहे. असा परमात्मा श्रीकृष्ण मायेच्या स्वाधीन होत नाही. त्या मायेचे म्हणजे प्रकृतीचे सत्वरजादि गुण ते जणूंकाय याच्याच घरचे. त्या गुणाच्या साहाय्याने याने लोकदृष्ट्या एखादे अनुचित कृत्य केले तरी ते चांगलेच. बहुरुप्याने दाखविलेला खोटा व्यवहार बहुरुपीच जाणतो.; यात काही नवल नाही. रखमादेवीवर जो बाप श्रीविठ्ठल त्याला यथार्थ जाणले तर ही सर्व कोडी उकलतील रे बाबा ! ॥५॥ ॥ जय जय ज्ञानेश्वर माऊली ॥



# ॥ अभंग-माधव ॥



माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630

हरीचे हे ध्यान । बैसे शेषावरी ।
दृष्टी सर्वांवरी । नित्य असे ॥१॥
संगे त्यांच्या लक्ष्मी । घेऊनिया हाती ।
कमळाची पाती । हरीसाठी ॥२॥
हाती घेऊनिया । पद्म आणि गदा ।
शंख चक्र सदा । सज्ज असे ॥३॥
शिरावरी त्याच्या । सुवर्ण मुगुट ।
मोरपिस त्यात । शोभतसे ॥४॥
अशा या हरीचे । प्रसन्न वदन ।
करूया नमन । सारे त्याला ॥५॥
माधव हा म्हणे । निर्दाळण्या दुष्ट ।
आता व्हा प्रविष्ट । देवराया ॥६॥



# आरोग्य संजीवनी

## थंडीत फक्त ५ मिनिटं गरम पाण्यात पाय घालून बसा

ज्योतिर्मय साहित्य

पाय गरम पाण्यात बुडवून ठेवणं हा उपाय सोपा वाटू शकतो पण शरीराला याचे बरेच फायदे होतात. आपले पाय दिवसभर आपल्या शरीराचा भार उचलतात, तसंच पायांनी आपण तासनतान उभं राहतो, चालतो. अशा स्थितीत शरीरासोबतच मनाला शांती मिळणंही गरजेचं असतं. नियमित याचा वापर केल्यानं अनेक आजारांपासून बचाव होतो.

गरम पाण्यात पाय ठेवल्यानं ब्लड सर्क्युलेशन चांगले होते, ताण-तणाव कमी होतो, थकवा दूर होतो. सेल्फ केअर रुटीनमध्ये या पद्धतीचा समावेश करू शकता. ज्यामुळे शरीराची हिलिंग प्रोसेस व्यवस्थित होईल. जर झोपताना तुमच्या पायांमध्ये वेदना होत असतील तर तुम्ही गरम पाण्यात पाय ठेवू झोपू शकता. ज्यामुळे तुमच्या पायांच्या नसांना आराम मिळेल आणि झोपही चांगली येईल.

पाय गरम पाण्यात ठेवल्यानं काय होतं ?

गरम पाण्यात पाय बुडवून झोपल्यानं शरीराचं तापमान थोडं वाढते ज्यामुळे रक्तप्रवाह व्यवस्थित होतो. ज्यामुळे पायांच्या नसांमध्ये वेदना, ताण - तणाव कमी होतो. तर तुम्हाला दीर्घकाळ उभं राहण्याचं काम करायचं असेल तर ही हिलिंग थेरेपी तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. गरम पाणी तुमच्या मांसपेशींना रिलॅक्स करते याशिवाय थकवा गायब करते.

गरम पाण्यात पाय ठेवणं का फायदेशीर

पायांमध्ये पायांमध्ये सूज, वेदना होत असतील ही समस्या टाळता येऊ शकते. ज्यामुळे ताण-तणाव कमी होतो. कारण पायांना आराम दिल्यानं संपूर्ण शरीरावर याचा परिणाम होतो. हिवाळ्याच्या दिवसांत जर तुमचे पाय थंड राहत असतील तर ते गरम करण्यासाठी तसंच रक्त संचार ठीक करण्यासाठी ते फायदेशीर ठरू शकते.

गरम पाण्यात मोठे मीठ दोन चमचे. कापूर. (तीन ते चार वड्या) अर्धा लिंबू घालून पाय ठेवण्याचे फायदे

१. मिठामुळे सूज व वेदना कमी होते

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

मीठ मिसळल्यामुळे गरम पाण्याचा परीणाम अधिक वाढतो. मिठातील मॅग्रेशियम आणि अन्य खनिजं त्वचेला आराम देतात तसंच सूज कमी करण्यास मदत करतात. यामुळे डिटॉक्सिफिकेशन मध्येही मदत होते. खासकरून पायांवर दुर्गंध येत नाही. मीठाचं पाणी पायांसाठी फायदेशीर ठरते. एप्सम सॉल्ट, सैंधव मिठाचा वापर उत्तम मानला जातो. रोज थंडीत गरम पाण्यात मीठ घालून २० मिनिटं पाय यात ठेवा. ज्यामुळे पायांना वेदनांपासून आराम मिळेल. तसंच पायांना भेगासुद्धा पडणार नाहीत.

२. कापूरामुळे उबदारपणा व वेदना कमी

कापूर शरीराला उब मिळवून देतो, स्नायूंचा ताठरपणा कमी करतो.


बधिरपणा, झिणझिण्या किंवा थंडीमुळे आलेली कमी होते.

३. लिंबूमुळे स्वच्छता व टॉक्सिन काढणे (डिटॉक्स फीलिंग)

लिंबूचे गुण पायाची त्वचा स्वच्छ करतात,

दुर्गंधी कमी करतात, फंगल इन्फ ेक्शनचा धोका कमी करतात, ताप आल्यानंतर गरम पाण्यात पाय ठेवल्यानं काय फायदे मिळतात.

ताप आल्यनंतर पाय गरम पाण्यात ठेवणं हा जुना उपाय आहे. ज्यामुळे शरीराचं तापमान संतुलित राहतं तसंच ताप हळूहळू कमी होऊ लागतो. तसंच शरीराच्या नसा सक्रिय होता. शरीराची ऊर्जा स्थिर राहते.



# लघु बोधकथा

♦ सुसंवाद♦

एका शहरात एक दांपत्य राहत होते. पतीचा मोठा व्यवसाय होता. गावात पतीला चांगली प्रतिष्ठा होती. कामाच्या व्यापात तो दिवसभर व्यग्र राहत असे. आपल्या व्यग्र जीवनशैलीमुळे तो पत्नीला वेळ देऊ शकत नसे यामुळे पत्नी एकाकी पडत चालली होती. एकाकीपणाने ती कायमच अस्वस्थ राहायची, आपल्या मनातील गोष्टी ती कोणाला सांगूही शकत नव्हती. पतीला काही सांगायला जावे, तर तो उद्या ऐकू, परवा ऐकू असे सांगून तिच्यासमोरून निघून जायचा. एकेदिवशी दोघांत मोठे भांडण झाले. पती चिडून म्हणाला, '' तू तर माझ्या व्यवसायात मला काडीचीही मदत करत नाहीस, त्यामुळे मी माझ्या मुलाला वकीलच बनविणार आहे. तो निदान मला कोर्टाच्या कामात तरी मदत करेल.'' त्याचे हे बोलणे ऐकताच बायको भडकली आणि म्हणाली,'' तुम्हाला तर स्वत:चेच पडले आहे, माझ्याकडे लक्ष द्यायला कुठे तुम्हाला वेळ आहे. मी माझ्या मुलाला डॉक्टरच बनविणार आहे. जेणेकरून मी आजारी पडल्यावर तरी तो माझी काळजी घेईल.'' दोघेही आपल्या मुलाला काय बनवायचे यावरून जोरजोरात भांडू लागले, एकमेकांची उणीदुणी काढू लागले, भांडणाचा शेवट अगदी हातापायीपर्यंत येऊन पोहोचल्यावर आजूबाजूचे लोक जमा झाले व त्यांच्यातील एका सज्जन माणसाने मध्यस्थ म्हणून तेथे प्रवेश केला व म्हणाला,'' अहो तुमचे दोघांचेही ठीक आहे, पण मुलाचा कोणत्या शाखेकडे कल आहे ते तरी बघा. त्याला काय व्हायचे ते त्याला ठरवू द्या ना. तुम्ही काय उगीच ठरवून त्याच्यावर तुमची मते लादत आहात.'' हे बोलणे ऐकताच नवराबायको एकदम गप्पच झाले. कारण त्यांना अजून मुलबाळ काहीच नव्हते आणि भविष्यात होणा-या मुलाच्या भवितव्याविषयी ते भांडत बसले होते. लोकांना ही गोष्ट कळताच त्यांनी त्या दोघांना अक्षरश वेड्यात काढले व आपला वेळ फुकट गेला म्हणून निघून गेले.

तात्पर्य- व्यर्थ गोष्टींवर वाद घालून कोणतीही गोष्ट साध्य होत नाही./ भविष्यातील गोष्टींची चिंता करण्यापेक्षा वर्तमानातील गोष्टींचा विचार करणे चांगले असते.

# व्यावसायिक चालकांसाठी मोफत डोळे तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया

## एएसजी आय हॉस्पिटलची 'ड्रायव्हर दृष्टी' मोहीम

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : वाहनचालकांच्या डोळ्यांचे आरोग्य सुधारून रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने एएसजी आय हॉस्पिटल तर्फे ''ड्रायव्हर दृष्टी'' ही विशेष सामाजिक मोहीम राबवण्यात येत आहे. ही मोहीम २० जानेवारी ते ११ फेब्रुवारी या कालावधीत एएसजी आय हॉस्पिटल, ए.जी. प्राइम हाऊस, ५-५-५७, क्रांती चौक, रेल्वे स्टेशन रोड, नवीन उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे सुरू आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन महानगरपालिका आयुक्त मा. श्री. जी. श्रीकांत यांच्या शुभहस्ते होणार असून, यावेळी एएसजी आय हॉस्पिटलचे वरिष्ठ अधिकारी व अनुभवी नेत्रतज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत.

या विशेष अभियानाअंतर्गत ऑटो, ट्रक, कॅब तसेच इतर सर्व व्यावसायिक वाहनचालकांसाठी मोफत डोळे तपासणी आणि आवश्यक असल्यास




पूर्णपणे मोफत मोतीबिंदू (कॅट्रॅक्ट) शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी चालकांकडे वैध ड्रायव्हिंग परवाना असणे आवश्यक आहे.

एएसजी आय हॉस्पिटल प्रशासनानुसार, चालकांची स्पष्ट दृष्टी ही केवळ त्यांच्या उपजीविकेसाठीच नव्हे, तर प्रवाशांच्या आणि समाजाच्या सुरक्षिततेसाठीही अत्यंत महत्त्वाची आहे. विशेषतः रात्री वाहन चालवताना किंवा लांब पल्ल्याच्या प्रवासात दृष्टी कमी असल्यामुळे अपघातांचा धोका वाढतो. वेळेवर मोतीबिंदूचे निदान आणि उपचार न झाल्यास गंभीर परिणाम होऊ शकतात. ही बाब लक्षात घेऊनच हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या मोहिमेअंतर्गत -पात्र चालकांच्या डोळ्यांची मोफत तपासणी, -तज्ज्ञ नेत्रवैद्यांकडून विनामूल्य सल्ला, -आवश्यक असल्यास पूर्णपणे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, -तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने दर्जेदार उपचार उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

या उपक्रमाबाबत एएसजी आय हॉस्पिटलच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, ''दररोज रस्त्यावर लाखो लोकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी पेलणाऱ्या चालकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवणे हा आमचा मुख्य उद्देश आहे.

'ड्रायव्हर दृष्टी' उपक्रमाच्या माध्यमातून आम्ही चालकांना स्वच्छ दृष्टी आणि सुरक्षित भविष्य देण्याचा प्रयत्न करत आहोत.'' व्यावसायिक वाहनचालकांच्या आरोग्याची काळजी घेणे, त्यांना आवश्यक उपचार सुविधा उपलब्ध करून देणे आणि रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती वाढवणे या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला वाहनचालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सर्व पात्र चालकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपले ओळखपत्र व ड्रायव्हिंग लायसन्स घेऊन जवळच्या एएसजी आय हॉस्पिटल केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेमार्फत करण्यात आले आहे.

# विश्वविक्रमी कथा वाचन महोत्सवाचे यशस्वी आयोजन

ज्योतिर्मय साहित्य

विश्वविक्रमी ऑनलाईन काव्यवाचन सोहळ्याच्या यशस्वी आयोजनानंतर मराठी भाषा पंधरवड्याचे औचित्य साधून साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे यांच्या संकल्पनेतून साहित्यसंपदा आयोजित गोष्टी तुमच्या आमच्या ऑनलाईन कथावाचन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते .दिनांक २४-१-२६ ते २६-१-२६ या काळात फेसबुक लाईव्ह पार पडलेल्या कथा वाचन सोहळ्यात महाराष्ट्रातीलच नव्हे तर बेंगलोर,कतार,सिंगापूर,अमेरिका येथील विविध भागांतून,स्तरांतून कथाकारांनी यशस्वी सहभाग नोंदविला.तीन दिवस चाललेल्या या कथावाचन सोहळ्यात अनेक नामवंत कथाकार आणि महाराष्ट्रातील विविध ७ शाळा सहभागी झाल्या होत्या. ऑनलाईन सांगता समारंभास राजन लाखे (बकुळगंधकार) जेष्ठ साहित्यिक,अध्यक्ष महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा यांनी उपक्रमाचे कौतुक करताना वाचन चळवळीचे महत्व उदाहरणासहित उलगडून दाखविले. डॉ.सोनाली लोहार स्तंभ लेखिका, कथाकार, व्हॉइस थेरपिस्ट यांनी शाळेतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना वाचन संस्कृतीची बीजे मुलांच्या मनात रुजविणे गरजेचे आहे अशी भावना व्यक्त केली.एकनाथ आव्हाड सुप्रसिद्ध बालसाहित्यिक साहित्य अकादमी, बाल साहित्य पुरस्कार प्राप्त यांनी उपक्रमाचे कौतुक करताना कथावाचन महोत्सवातील सर्व



सहभागींना शुभेच्छा दिल्या.डायमंड बुक ऑफ रेकॉर्डस् तर्फे समन्वयक डॉ.योगेश जोशी यांनी सदर कथा वाचन महोत्सवाची नोंद विश्वविक्रम म्हणून झाल्याची घोषणा करताच मराठी कथांची दखल जागतिक पातळीवर घेतल्याचा आनंद सगळ्यांच्या मनात ओसंडून वाहत होता.


कार्यकारणी सदस्य अपेक्षा बिडकर, सलोनी बोरकर, वैशाली कदम, अर्चना गोरे, मानसी नेवगी,किसन पेडणेकर, स्मिता पेशवे, लालसिंग वैराट, स्मिता हर्डीकर, मंजुळ चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विश्व् विक्रमी कामगिरी करताना आलेल्या अनुभवांचे कथन केले.या कथावाचन महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे शुभंकरोति साहित्य मंच, मुंबई, साहित्यिक सखी, ग्रुप, उदगीर, अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठान, कल्याण, शब्दशिल्प कलाविष्कार संघ, मुंबई, अभिनव फाउंडेशन, भडगाव या महाराष्ट्रातील विविध भागांतील संस्थांनी यात सहभाग नोंदविला.डिजिटल पार्टनर मनोमय मीडिया यांनी काम पाहिले. सदर सांगता सोहळ्यास अश्विनी निवर्गी यांनी आपल्या साहित्यिक सखी उदगीर संस्थेची ओळख करून देताना गृहिणींनी नवीन टेक्नॉलॉजीचे आव्हान लीलया पेलले असे म्हणून सर्व महिला कथाकारांचे अभिनंदन केले. सोनाली जगताप यांनी शुभंकरोति साहित्य मंच आगामी उपक्रमांत देखील सहभागी राहून मराठी भाषेसाठी कार्य करीत राहील असे आश्वासन दिले आणि उपक्रमास विशेष मदत लाभलेल्या अजित महाडकर, गीतांजली वाणी, मयूर पालकर, माया यावलकर यांचे आभार मानले.

या कथावाचनात पुण्याहून श्री गिरीश वसेकर यांनी ज्योतिर्मय या ई दैनिकात प्रकाशित त्यांची कथा ''कच्च्या कानाचा राजा'' वाचून सर्वांना आनंद दिला. अश्या या विश्वविक्रमी ऑनलाईन कथावाचन सोहळ्याचे संकल्पनाकार वैभव धनावडे यांनी सर्व मान्यवरांचे, सहभागी संस्था, शाळा आणि सहभागी वाचकांचे आभार मानताना मराठी भाषेच्या सेवेसाठी सातत्याने नवं नवीन प्रयोग राबविण्याची ग्वाही दिली.

मराठी भाषा पंधरवड्याची सांगता विश्वविक्रमी सोहळ्याने झाल्याने साहित्य वर्तुळात आनंदाचे वातावरण पाहण्यास मिळाले. शासनाने अश्या उपक्रांची दखल घेऊन कौतुकाची थाप सदर संस्थांना द्यावी अशी भावना व्यक्त होताना दिसत आहे.

# साहित्योत्सव स्वागताध्यक्षपदी मंत्री अतुल सावे यांची निवड

ज्योतिर्मय साहित्य



छत्रपती संभाजीनगर - छत्रपती संभाजीनगर येथे येत्या २०, २१ आणि २२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या साहित्योसवाच्या स्वागताध्यक्षपदी इतर मागास बहुजन कल्याण व दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांची निवड करण्यात आली आहे.

साहित्य भारती देवगिरी प्रांत आणि सरस्वती भुवन शिक्षण संस्थेतर्फे हा साहित्योसव आयोजित करण्यात आला आहे या उत्सवाची जोरात तयारी सुरू असून उत्सव यशस्वीतेसाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. शहरातील ज्येष्ठ उद्योजक विकास कापरे हे या उत्सवाचे कार्याध्यक्ष राहतील. सरस्वती भुवन चे अध्यक्ष ॲड. दिनेश वकील हे उपाध्यक्ष तर प्रसाद शेरकर कोषाध्यक्ष, सुरेश जगाडे सहकोषाध्यक्ष राहतील, अशी माहिती साहित्योत्सवाचे निमंत्रक प्रा.डॉ. सर्जेराव जिगे, कार्यवाह डॉ. आर्कि. अनिरुध्द नाईक, साहित्य भारतीचे प्रांत अध्यक्ष प्राचार्य संजीव गिरासे, कार्याध्यक्ष उमेश काळे यांनी दिली.

### लेखकांचे शुभेच्छा पत्र....

नमस्कार संजय सर!
'ज्योतिर्मय'च्या वर्षपूर्तीचा भव्य दिव्य सोहळा आयोजित केल्याबद्दल आपले मनापासून अभिनंदन. त्यात सहभागी साहित्यिकांची हजेरी तर होतीच पण, आपण या कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून आपली जबाबदारी खूपच मोठी होती. हा निव्वळ उत्सव न राहता साहित्यमेजवानी अतिशय उत्कृष्टरित्या आयोजित झाली, त्यात आम्ही प्रत्यक्षरित्या हजर नसल्याने आपण त्याचे फोटो आणि विडिओ शेअर केलेत त्याबद्दल आभार.
आपले भाषण देखील या निमित्याने ऐकता आले याचे अप्रूप आहेच.
असा सुंदर योग दरवर्षी जुळून यावा अशी आशा करते, भविष्यात त्यात हजेरी लावण्याचा योग देखील जुळून आला तर खूपच आनंद होईल. ज्योतिर्मयच्या प्रकाशमान वाटचालीकरता आपल्या अनवरत कष्टांचे फलित म्हणजे हा कार्यक्रम.
आपले पुनश्च अभिनंदन आणि आभार! 💐🌹
✍मीना श्रीवास्तव,
ठाणे, 99201 67211



मूल मराठी लेखक-सचिन वसंत पाटील हिन्दी भावानुवाद-डॉ. मीना श्रीवास्तव

# मेहनत की रोटी

आगे..........
बैंक वाले उसकी बात सुनने को तैयार नहीं थे। उन्होंने ज़ब्ती का नोटिस जारी कर दिया। इसके पहले भी दो-तीन बार उनको समझा बुझाकर उसने गाड़ी वापस भिजवा दी थी। लेकिन अब उसके सामने अंतिम विकल्प बचा था। विनायक ने बहुत सोचविचार कर चचेरे चचा को १२ वर्ष के लिए पट्टेदारी के नियमानुसार खेती करने के लिए देने का फैसला किया। अग्रिम भुगतान मिलने पर खेत में उगाए अनाज पर उसका कोई हक़ नहीं होगा, ऐसा समझौता हुआ। चचा से मिले पैसों से उसने बैंक का सारा कर्ज चुका दिया। तब कहीं जाकर कर्जे से मुक्ति मिली।

अस्थायी रूप से कर्ज़ का भुगतान तो हो गया था। लेकिन वक्त बेवक्त के लिए संजोयी जमा-पूंजी खत्म होती जा रही थी। मल्कियत की जमीन और जनावर अब नहीं रहे सो, एक पाई तक की आमदनी की गुंजाईश कहाँ थी? बारह साल बीत गए थे, जमीन से किसी भी प्रकार अब नाता टूट चूका था। दुधारू जानवरों को बेच अपने पाँव पर कुल्हाड़ी मार ली थी। अब आगे चलकर क्या किया जाए, यह एक ही प्रश्न विनायक के समक्ष राक्षस का रूप धारण किये मुंह फाड़ कर खड़ा था। अगर दिहाड़ी (दैनिक) मजदूरी पर कुदाल- फावड़ा लेकर काम करूँ तो वह मुझे मुझसे बाप- जनम में असंभव है, और लोग क्या कहेंगे? कल का अंगूरबाग का मालिक आज किसी और का गुलाम! विनायक के दिमाग में यह बात बैठ ही नहीं सकती थी। वह ऐसा कोई काम नहीं करना चाहता था जिस के कारण कोई उसपर उंगली उठाता और भरे चौराहे पर वह उपहास का विषय बनता। वह पहले से ही घोर निराशा की गर्त में डूबा हुआ था। और अब उसके मन को एक प्रश्न ही कुरेदता जा रहा था कि, अब आगे क्या करे। धीरे-धीरे घर में खाने-पीने की सारी चीजों का संचय खत्म होने लगा। बेचारी पत्नी किसी तरह कम से कम खर्चे में गुजारा कर रही थी। लेकिन अगर एक पैसे की भी आमदनी न हो तो यह कंजूसी कितने दिनों तक गृहस्थी का बोझ उठा पायेगी? अगर किसी पानी की टंकी में हमने पानी इकठ्ठा कर रखा है, और उसमें बिना एक भी बून्द पानी जोड़े, उस संचयित पानी को पंप से रोज ही निकालते चले गए, तो वह एक न एक दिन खाली होकर रहेगी। क्रमश:.......

ज्योतिर्मय

MFO
Mutual Fund Online
Sahi hai.....
म्युच्युअल फंड ऑनलाईन
विनोद शिराळकर 9325383999

SIP की SWP

मला म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक करायची आहे. पण समजत नाहीये की मी काय करू SIP की SWP.
आजच्या काळात म्युच्युअल फंड हा गुंतवणुकीचा लोकप्रिय मार्ग झाला आहे. म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक करताना दोन संकल्पना विशेष महत्त्वाच्या आहेत – SIP (सिस्टेमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) आणि SWP (सिस्टेमॅटिक विड्रॉवल प्लॅन). दोन्हीही नियोजित पद्धतीने चालतात, पण त्यांचा उद्देश वेगवेगळा आहे.
■ SIP म्हणजे काय?
SIP म्हणजे ठराविक कालावधीत (महिना/तिमाही) ठराविक रक्कम म्युच्युअल फंडात गुंतवणे.
■ SIP ची वैशिष्ट्ये:
नियमित आणि शिस्तबद्ध गुंतवणूक
लहान रकमेपासून सुरुवात शक्य
बाजारातील चढ-उताराचा धोका कमी होतो
दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्यास उपयुक्त
■ उदाहरण:
आपण दरमहा ₹5,000 SIP द्वारे इक्विटी म्युच्युअल फंडात गुंतवले, तर काही वर्षांत मोठा निधी तयार होऊ शकतो. हा निधी निवृत्ती, मुलांचे शिक्षण किंवा घर खरेदीसाठी उपयोगी ठरतो.
क्रमश:..........



आम्ही तुमचे पुस्तक प्रकाशित करू !

ज्योतिर्मय प्रकाशन

प्रत्येक लेखकाचं एकच स्वप्न असते ते म्हणजे माझ्या कवितांचे, लेखांचे, कथांचे, कादंबरीचे पुस्तकात रूपांतर व्हावे व ते जास्तीतजास्त वाचकांपर्यंत पोहोचावे, मग हे स्वप्न आम्ही पूर्ण करू.
उत्कृष्ट छपाई, साजेसे मुखपृष्ठ अगदी कमी वेळेत व अगदी बिनचूक.
मग वाट कसली बघता तुमचे स्वप्न पूर्ण करा ज्योतिर्मय प्रकाशन सोबत.
लगेच कामाला लागा व आम्हाला खाली दिलेल्या नंबरवर संपर्क करा.
ज्योतिर्मय प्रकाशन
■ पुणे ■ छ. संभाजीनगर
संपर्क : 7743 81 8559



ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ

साहित्यिक मित्रांनो,
आता लिहा बिनधास्त कारण आता तुमच्या साहित्याला प्रकाशित करण्यासाठी आले आहे एक भव्य व्यासपीठ
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ
"ज्योतिर्मय" साहित्याचे विद्यापीठ.
साहित्यावरील प्रत्येक घटना, कथा, कविता, लेख, परीक्षण, पुरस्कार, संमेलन प्रत्येकाची नोंद आम्ही घेणार, मग विचार कसला करता!
हो जाओ शुरु....
या व्यासपीठावर तुमचे सर्वांचे स्वागत आहे.
- संजय व्यापारी, संपादक 7743918559
ज्योतिर्मय-साहित्याचे विद्यापीठ



ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

# दोन हात तिसरं मस्तक

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

सुटीचा दिवस म्हणजे अगदी छोटीशी सहल किंवा एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी मारलेला फेरफटका अशी व्याख्या आमच्या कुटुंबाची होती. अशाच एका रविवारी सायंकाळी कुरणेश्वरला जायचं आणि खिंडीतील गणरायाचं दर्शन घ्यायचं आणि येताना भेळ खायची असं ठरलं. फिरुन येताना भेळ म्हणजे चेरी ऑन द केक. मंदीर परिसरात बदकं, मोर, ससे बघायला मिळतात, कमळाची आणि वेगवेगळी सुंदर फुलंही बघायला मिळतात, घसरगुंडीवर खेळायला मिळतं हा मुलांसाठी परमोच्च आनंदाचा अनुभव असतो.

मग काय? शाळेचा गणवेश विसरून आवडते कपडे घालून दोघं तयार झाले पण. कोण आईच्या गाडीवर बसणार आणि कोण बाबांच्या गाडीवर बसणार यावर धुडगूस घालून झाला आणि अखेर आमच्या गाड्या कुरणेश्वरला पोहोचल्या. तिथून अजिंक्यताऱ्याच्या मागच्या बाजूचं आणि सज्जनगडाचं होणारं दर्शन अगदी सुखावह. तिथं रस्त्याच्या दुतर्फा असलेली वडाची झाडं, त्या झाडांच्या सावल्या, तिथली शांतता आणि एक प्रकारचं कमालीचं सात्विक वातावरण यामुळेच की काय आम्ही दर महिन्याला दोनवेळा तरी जातोच तिकडे.

कधी एकदा गाडी पार्क करून दगडी पायऱ्या उतरतोय, असं मुलांना झालं होतं. हात सोडायचा नाही, ही सूचना सगळ्याच मुलांना जाचक वाटते खरी पण पालकांच्या दृष्टीने महत्त्वाची ना.

सुटीचा दिवस आणि संध्याकाळ त्यामुळे साहजिकच दर्शनाला मोठी रांग होती. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने चपला योग्य ठिकाणी काढून आम्ही रांगेत उभे राहिलो.

जसजशी रांग पुढे सरकत होती तसतसा मुलांचा उत्साह वाढत होता. अर्ध्या तासाने आम्ही गणरायाच्या लाडक्या मूषकाजवळ आलो. कृष्णा बारकाईने निरीक्षण करत होता. त्यानं पाहिलं, त्याच्याच वयाच्या दोन मुली उंदीर मामाच्या कानात काहीतरी सांगतायत. दोघींचं सांगून झालं की जग जिंकल्याच्या आविर्भावात त्या आपापल्या पालकांकडे गेल्या.

कृष्णानं मला विचारलं, 'आई, त्या मुलींनी उंदीर मामाच्या कानात काय गं सांगितलं?' मी म्हटलं, 'हे जागृत देवस्थान आहे ना, मग इथल्या उंदीर मामाच्या कानात आपल्याला जे हवंय ते सांगायचं, मग उंदीरमामा आणि गणपतीबाप्पा आपली इच्छा पूर्ण करतात'

कृष्णाचे डोळे चमकले. 'आई, मलाही गोल्ड मेडल मिळवायचंय', तो म्हणाला. मी लगेचच त्याला म्हटलं,'अरे मग जा ना तूही, मामाच्या कानात सांग, बाप्पा तुझं लगेच ऐकेल.'






मला वाटलं माझा हात सोडून तो धावत उंदिरमामाकडे जाईल. पण तसं झालं नाही. तो विचारात पडला आणि काही क्षणातच आपल्या हाताची मूठ करुन ते मनगट गोलाकार फिरवत मला म्हणाला, 'मामाच्या कानात सांगून किंवा बाप्पाला मागून गोल्ड मेडल मिळत नाही. त्यासाठी जिगर लागतो' त्याचं हे वाक्य माझ्यासाठी मोठा धक्का होता.

मी विचारलं, 'तुला रे कुणी सांगितलं हे?'

तो म्हणाला, आमच्या शाळेत ॲन्युअल फंक्शनला जे गेस्ट आले होते ना त्यांनी सांगितलं आम्हाला'.

मला काय बोलावं हेच सुचेना. पण मग मीही त्याला उंदीर मामाच्या कानात सांग असा आग्रह केला नाही. तोही आपल्या निर्णयावर ठाम राहिला. तो त्यावेळी केवळ सात आठ वर्षांचा होता. मी मनातल्या मनात कबूल केलं हा ठामपणा जो माझ्या मुलाकडे आहे तो आजतागायत माझ्याकडे नाही. असा वेगळा विचार करण्याची क्षमता माझ्याकडे नाही. मला आठवतंय मला माझ्या आईनं सांगितलं की या दगडासमोर डोकं टेकव की मी न विचार करता डोकं टेकवायचेच. मी कधीच विचार केला नाही की दगडाला का देव मानायचं?

लहान मुलं अंधश्रद्धेला लवकर बळी पडतात, त्यांच्या करमणुकीसाठी सांगितलेल्या गोष्टी त्यांना खऱ्या वाटतात. मग कल्पनेतील परी असो वा राक्षस. मुलं ते गृहीत धरून चालतात. असा सर्वसाधारण माझा समज होता. पण त्या समजालाच कृष्णानं छेद दिला होता. त्याला श्रद्धा आणि स्वतःची ताकद यातला फरक कळला होता. मला प्रचंड नवल वाटत होतं. खरंतर मी का असा वेगळा विचार करु शकत नाही, हा प्रश्न मला छळत होता.

अगदी तो शाळेत जाण्याआधीपासूनच गणपतीची पूजा, स्तोत्र पठण, आरती करणं, नैवेद्य दाखवणं, बाप्पाकडे चांगली बुद्धी मागणं आणि वेळोवेळी वेगवेगळ्या मागण्या करणं असंच मी मुलांना शिकवलं होतं. मला अपराधीपणाची भावना आली.

देवाकडे काही मागण्यानं आपल्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण होते आपण जे मागितलंय ते बाप्पा आपल्याला देणार असं आश्वासन आपल्याला मिळतं, देवावरील आपल्या श्रद्धेमुळे आपण निश्चिंत होतो.

ही श्रद्धा मुलांच्या मनात निर्माण करताना समांतरपणे मी त्यांच्या मनात वास्तवाचं भान दिलं का? हा प्रश्न मला पडला आणि मी इथं कमी पडलेय हा अपराधी भाव मनात दाटला.

कृष्णाच्या मनात बाप्पाविषयी श्रद्धा होतीच ती त्याने नाकारली नाही पण त्या श्रद्धेला कृतीची, श्रमाची जोड असायलाच हवी, ही त्याची भूमिका होती.

मागून गोल्ड मेडल मिळणार नाही, या मतावर तो ठाम राहिला. इथे बाल जिज्ञासा फक्त प्रश्न विचारण्यात दिसत नाही, तर निष्कर्ष काढण्यातही दिसते. त्यानं इतर मुलींचं वागणं पाहिलं, माझ्याकडून समजावून घेतलं आणि मग स्वतःच्या अनुभवांशी, शाळेतल्या पाहुण्यांच्या बोलण्याशी ते ताडून पाहिलं म्हणजेच तो फक्त ऐकलेली माहिती गृहित धरत नाही; ती तपासतो. हीच खरी जिज्ञासा.

कृष्णाला खात्री आहे की यश ही बाहेरून मिळणारी कृपा नाही, तर स्वतःच्या कष्टातून मिळणारी गोष्ट आहे. ही जाणीव फार लवकर त्याच्या मनात आली होती आणि म्हणूनच ती मला धक्का देणारी वाटली. या प्रसंगात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मला वाटतो तो म्हणजे आदर्शांचा प्रभाव. शाळेतल्या पाहुण्यांनी उच्चारलेली एक ओळ "त्यासाठी जिगर लागतो" ती कृष्णाच्या मनात खोलवर रुजली आहे. लहान मुलांचं मन कोरी पाटी असतं असं म्हणतात; प्रत्यक्षात ते संवेदनशील पाटी असतं. योग्य वेळी मिळालेला योग्य संदेश त्यांच्या मूल्यव्यवस्थेचा भाग बनतो.

पालक म्हणून आपल्याला अनेकदा नव्हे तर नेहमीच वाटतं की आपणच मुलांना घडवत असतो. पण अशा प्रसंगातून लक्षात येतं की समाज, शाळा, अनुभव हे सगळे घटक मिळून मूल घडवत असतात. देवाकडे मागणं चुकीचं नाही, पण फक्त मागणं पुरेसं नाही, हे समजणं ही परिपक्कतेची सुरुवात आहे.

कुरणेश्वरच्या त्या शांत परिसरात, उंदीर मामाच्या कानाजवळ न गेलेला कृष्णा प्रत्यक्षात जीवनाचा एक महत्त्वाचा धडा शिकून गेला होता आणि नकळत आपल्यालाही शिकवून गेला होता. बाल जिज्ञासा ही केवळ कुतूहल नसून, ती भविष्याच्या आत्मविश्वासाची पायाभरणी असते, हेच या घटनेतून ठळकपणे समोर येतं.

# नरहरी सोनार... हरीचा दास

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**






भागवत धर्माचा पाया संत मंडळींनी घातला. त्यांच्यात भेदभाव नव्हता. संत हे समानतेचे पाईक होते. भागवत धर्मात सर्व जातीव पंथातील इतकेच नव्हे तर धर्मातील संत होते. सगळेच संत भेदाभेद भ्रम अमंगळ मानणारे होते. सर्वांनी विठ्ठलाला आराध्य दैवत मानले. संतामध्ये स्त्री संतही होत्या. सत ज्ञानेश्वरांपासून ते चोखामेळापर्यंत सगळे भेदभाव विसरून विठ्ठलभक्ती करीत होते. संत नामदेव, संत एकनाथ, तुकाराम, चोखामेळा, जनाबाई, मुक्ताबाई, या सर्व संतांनी हरीभक्तीचा संदेश दिला. भक्तीचा मळा फुलविला.

या सर्व संतात संत नरहरी सोनार वेगळे होते. सर्वत संत आपला कामधंदा करीत व तो हरीरूप मानून भक्ती करीत. परंतु नरहरी कट्टर शिवभक्त होते. शंकराची भक्ती म्हणजे त्यांचा जीव की प्राण. शिवशंकराशिवाय कोणाही देवाचे ते दर्शन घेत नसतं. शिवाच्या दर्शनाशिवाय ते मुखात पाणीदेखील घेत नसतं. इतके ते कट्टर शिवभक्त होते. परंतु नरहरीला शिव आणि हरी यांच्यातील अव्दैताचे दर्शन घडविण्याचा घाट देवांनीच घातला.

एक सावकार हरीभक्त होता त्याने विठ्ठलाला करदोटा अर्पण करण्याचा नवस बोलला होता. त्याने मुलाच्या मुंजीत तो नवस बोललो होता. चांगला सोनार कोण आहे याची त्याने चौकशी केली. त्यावर अनेकांना त्याला नरहरीचे नाव सुचविले. त्याप्रमाणे तो पंढरपूरला आला. विशेष म्हणजे पंढरपुरात राहून देखील नरहरी महाराजांनी कधीच हरीदर्शन घेतले नव्हते.

विठ्ठलाने त्यांची परीक्षा घेऊन त्यांना अव्दैताची शिकवण दिली. त्याचे असे झाले. सावकार नरहरी महाराजांकडे आला. व विठ्ठलाला करदोटा बांधण्याचा नवस त्यांना सांगतो. आणि करदोटा करून देण्यास सांगतो. नरहरी मान्य करतात. मग नरहरा त्यांना विठ्ठलाच्या कमरेचे माप आणण्यास सांगतो. सावकार माप घेऊन येतो. त्यानुसार नरहरीने करदोटा बनवून तो विठ्ठलाला अर्पण करायला सांगितले. सावकार करदोटा घेऊन मंदिरात आला. कमरेला लावून पाहतो तर तो आखूड झाला होता. मग सावकार परत माप घेऊन नरहरीकडे आला. परत करदोट बनवून दिला . तो सावकार घेऊन परत देवळात आला. तर तो करदोटा कमरेला बसेचना. फारच सैल झाला. त्यावर तो सावकार परत नरहरी कडे येऊन तूच माप घेऊन जा व करदोटा बनव असे त्याने सांगितले. पण नरहरीचा पण असतो. तो सावकाराला म्हणतो माझे डोळे घट्ट बांध म्हणजे मला विठ्ठलमूर्ती दिसणार नाही. नरहरी मंदिरात आले. डोळे बांधलेले चाचपडत विठ्ठलाच्या कमरेचे माप घेऊ लागले तर शिवमूर्तीच दिसू लागली. कमरेला व्राघ्यचर्म व गळ्यात नाग. त्यांनी डोळे उघडून पाहिले तर कटेवरी कर असा विठ्ठल दिसू लागला. त्यावेळी स्वतः शिवाने प्रकट होऊन नरहरीला आम्ही दोघेही अव्दैतच आहोत, असा साक्षात्कार दिला. आज माघ वद्य तृतीया त्यांच्या पुण्यतिथीचा दिवस. त्यांची जयंती श्रावण शुध्द त्रयोदशी

मग नरहरी त्या दिवसापासून पक्के वैष्णव बनले. त्यांच्या वडिलांचे नाव अच्युतराव व आईचे सावित्रीबाई. सर्व संतात ते ज्येष्ठ व वयोवृध्द म्हणून त्यांना लोक महामुनी म्हणू लागले. रामचंद्र, कृष्णदास, हरिप्रसाद, मुकुंदराज, मुरारी, अच्युत नरहरी व नारायण अशी त्यांची वंशावळ आहे. ते मुळचे सांगली जिल्ह्यातील मिरज संस्थानातील म्हेत्रे गावचे. त्यांचा जन्म पंढरपूर येथे झाला.

ते हरीभक्त होते. परंतु लग्न होऊन पुत्रसंतती होत नाही म्हणून मी विठ्ठलाचे तोंडही पाहणार नाही अशी प्रतिज्ञा त्यांनी केली. त्याची समजूत काढण्यासाठी स्वतः विठ्ठलाने बनाव रचून सावकाराकरवी नरहरीचा भ्रम दूर केला. मग नरहरी पक्का भागवत (विठ्ठल भक्त) बनला. विसाव्या वर्षी त्यांनी शैवपंथाची दीक्षा घेतली आपले आयुष्य विठ्ठलचरणी अर्पण केले. चांगदेवाने त्यांचे बारसे नामकरण केले. विसाव्या वर्षी ते शैव झाले. परंतु साक्षात्कारानंतर २६ व्या वर्षी त्यांनी वैष्णव धर्म स्वीकारला. आयुष्यभर तो पाळलाही. मग ते म्हणू लागले नरहरी सोनार हरिचा दास भजन करी रात्रंदिवस.

# श्रीयश फार्मसीच्या विद्यार्थ्याची आंतरराष्ट्रीय कंपनीत निवड

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**



छत्रपती संभाजीनगर : श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, छत्रपती संभाजीनगर यांच्यासाठी अभिमानाची बाब म्हणजे संस्थेचा विद्यार्थी श्री. ऋषिकेश फटाले याची स्ट्रायकर मेडटेक लिमिटेड, गुरुग्राम या नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत रेग्युलेटरी अफेअर्स विभागात रेग्युलेटरी अफेअर्स स्पेशलिस्ट या पदावर यशस्वी निवड झाली आहे.

निवड प्रक्रियेदरम्यान ऋषिकेश यांनी अर्ज व मुलाखतीत उत्कृष्ट कामगिरी सादर करून आपले व्यावसायिक कौशल्य सिद्ध केले. त्यांना प्रति वर्ष ₹१२ लाखांचे आकर्षक वेतन पॅकेज ऑफर करण्यात आले आहे.

या उल्लेखनीय यशामुळे श्रीयश इन्स्टिट्यूटच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतीची व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. इंजि. बसवराज मंगरूळे, मुख्य कार्यकारी अधिकारी निवृत्त कर्नल जॉय डॅनियल, संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच श्रीयश फार्मसीचे प्राचार्य डॉ. गणेश तापडिया, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी ऋषिकेश यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# राजगड फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी हार्टफुलनेसचे ध्यान शिबीर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**



भोर : येथील राजगड ज्ञानपीठच्या फार्मसी कॉलेज विद्यार्थ्यांसाठी हार्टफुलच्या वतीने वतीने रिलॅक्सेशन व ध्यानचे मोफत शिबीर घेण्यात आले. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजकुमार शेटे, प्रशिक्षक प्रमोद अंबुरे, मिल्ट्रीचे इंजिनियर ज्ञानेश्वर धाराशिवे, पत्रकार महावीर दुरुगकर, रेवणसिद्ध वाले यांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले.

विद्यार्थ्यांना स्मरणशक्ती वाढीसाठी व सुदृढ आरोग्यासाठी सकारात्मक विचारातून यशस्वी जीवन जगण्यासाठी या शिबीराचा त्यांना खूप लाभ झाल्याची प्रतिक्रियाही त्यांनी दिली.

हार्टफुलनेसचे लातूर जिल्हा केंद्रप्रमुख व प्रशिक्षक प्रमोद रामकृष्ण अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रेनर डॉ.आशुतोष काळे, यांनी ध्यान व मानसिक आरोग्य याविषयावर मार्गदर्शन करीत विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविला. शिथीलीकरण ध्यान, शुद्धीकरण ध्यान याचे प्रशिक्षण देण्यात आले.

ताणतणाव, भीती, क्रोध, नैराश्य, आत्मविश्वासाचा अभाव अशा समस्या सध्या वाढत आहेत. यातून मुक्त होण्यासाठी हार्टफुलनेस ध्यानधारणा शिबीर मोफत घेत असते. यातून मानसिक आरोग्य, धैर्य व शांती मिळते, असे प्रमोद अंबुरे यांनी सांगितले. शिबीर यशस्वी करण्यासाठी फार्मसी कॉलेजच्या सर्व प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

# तुझं माझं आभाळ अन् निर्माल्य

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**



तुझं ते माझं अन् माझं ते तुझं. असंच होतं! बरोबर नां ! जे माझं ते माझं नव्हतं, जे तुझं ते तुझं नव्हतं. जे उरलं ते काहीच नव्हतं. जे समर्पित ते सर्वस्व. समर्पित केलेल माझं स्वत्व तुझं अन् तू समर्पित केलेलं तुझं स्वत्व माझं. अस्तित्व होतं फक्त अर्पण केलेल्या निर्माल्याचं.


माझे क्षण तुझे
अर्पणाची आस
स्वत्व त्यागून
निर्माल्याचा ध्यास

असंच असतं कां? माझं आभाळ अन् तुझं आभाळ. ते तर तुझं ही असतं अन् माझं ही असतं. पण सारं तुझं ही नसतं अन् सर्व माझं ही नसतं. ते तुला माझं नाही असंही म्हणता येत नाही. आणि मला ते तुझं नाही असंही म्हणता येत नाही.

माझं विरलेलं स्वत्व
तेच तुझं आभाळ
तुझं झरलेलं स्वत्व
तेच माझं आभाळ

एकच श्वास, एकच आस, एकच ध्यास. एकाच आभाळाखाली तुझ्या माझ्या निर्माल्याची आरास. त्या निर्माल्याला नसते मी पण, नसते तू पण. एकमेकाचं एकमेकात विरलेलं अस्तित्व. तरी त्याला असतो तुझा गंध, माझा श्वास. तुझा रंग, माझा ध्यास. मी माझा कधीच नसतो, सर्वस्वी तुझा असतो. तु तुझी कधीच नसतेस, सर्वस्वी माझी असतेस. मला मी म्हणावं असं काय उरतं माझं अन् ज्याला तु म्हणावं असं काय उरतं तुझं?

आभाळाची छाया
तुझी माझी एक
एकाच त्या छायेत
विरला श्वास प्रत्येक




आभाळाचं अस्तित्व मोठं. महत्तम. त्यात सामावलेलं तुझं माझ्या दृष्टीनं तू असणं आणि तुझ्या दृष्टीनं माझं मी असणं. हेच असतं तुझं माझं आभाळ. एकमेकात सामावलेलं. आपली आपल्यातली व्याप्ती विस्तृत करणारं. आभाळ कधीच झाकत नाही तुला माझ्या पासून, मला तुझ्या पासून.

मीच माझा नसतो
तुझ्या आभाळाखाली
तूच तुझी नसते
माझ्या आभाळाखाली

माझ्या असण्याला मी केलेले प्रश्न उत्तरात तुला सांगतात. तुझ्या असण्याला तु केलेले प्रश्न मला सांगतात. माझं असणं तु

अन् तुझं असणं मी. तुझ्यात तु तुला विसरणं कारण असतं माझ्यात मी मला न दिसणं.

आभाळ पाहत असतं
कोण कोणात आहे
त्यालाच दिसतं कोणाच्या
काय मनात आहे

निर्माल्य झाल्याशिवाय निर्माल्य होण्यातला आनंद कळणार कसा? समर्पित झालेला आनंद पूर्ण समर्पणाशिवाय येत नाही. आभाळ हेच पाहतंय. तुला मला, निर्माल्य होताना. याच निर्माल्याचं पृथ्वीच्या तत्त्वांमध्ये विलीन होणं देखील आभाळाच्या साक्षीने होणार आहे. आभाळ ते पाहणार आहे.

पृथ्वीचे होणार
तुझे माझे कण
साक्षीला असेल
आभाळ पण

कधी विजा कडाडतात, अखंड आभाळ दुभंगवत. पृथ्वीशी नातं नसलेला डोळे दीपवणारा भयपूर्ण असह्य प्रकाश. प्रत्येक जीव असतो तेव्हां मुठीत अन् जीवाला असावं वाटतं मुठीत असणाऱ्याच्या मिठीत. मग आभाळ भरुन येतं. डोळे भरून पापण्यांचे काठ डबडबून यावेत तसं. ढगाच्या आतून कित्येक दिवसांचा दबून असलेला पाझर फुटतो. तेच आभाळ तुझं ही असतं आणि माझं ही. आभाळातून पाझरलेल्या या प्रवाहातच वाहून जातं तुझ्या माझ्या स्वत्वाचं समर्पित निर्माल्य. म्हणूनच

तुझं आभाळ
माझं असतं
माझं आभाळ
तुझं असतं

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559